CMYK

चंद्रपूर जिल्ह्यात नवीन शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालय सुरु संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवावे >>पान 2

आ. सिद्धार्थ खरात हा माझा गॅरंटीचा माणूस : माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे >>पान 3

सहा दरोडेखोर २४ तासात जेरबंद >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

**सुविचार**

जेथे अहंकार आहे, तेथे स्नेह आणि प्रेम नाही.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 147 ■ बुधवार, दि. 08 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



सलमानच्या सुरक्षेत वाढ! घराला बुलेटप्रूफ काच तर भिंतीवर काटेरी तार

आतील पान

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अधिकाऱ्यांसाठी सात कलमी कृती कार्यक्रम

## 'सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर करा'

## मुख्यमंत्र्यांचा सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य (व्हीसी) प्रणालीद्वारे संवाद

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे अर्थात ईज ऑफ लिव्हिंगसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना सात कलमी कृती कार्यक्रम निश्रि्चत करुन दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य (व्हीसी) प्रणालीद्वारे संवाद साधला.

यावेळी त्यांनी राज्यातील प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे याबाबत सविस्तर सूचना दिल्या. या सूचनांवर काय कार्यवाही केली याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आपल्या कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करा, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून द्या. संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करा. शासकीय कार्यालयांची स्वच्छता करा, अनावश्यक कागदपत्रे काढून टाका, खराब आणि वापरात नसलेली वाहने निर्लेखित करावीत.

शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह स्वच्छ राहतील, हे सुनिश्रि्चत करा. अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील, त्यावेळी ते स्वच्छ दिसले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर (ईज ऑफ लिव्हिंग) व्हावे यासाठी घेता किमान दोन सुधारणा, नाविन्यपूर्ण उपक्रम आपल्या कार्यालयात राबविण्यात यावेत. प्रलंबित कामांची संख्या शून्यावर कशी येईल, याचा प्रयत्न करा. अधिकारी नागरिकांना कधी उपलब्ध असतील याची माहिती फलकावर नमूद करा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

नागरिकांचे स्थानिक पातळीवर सुटू शकणारे प्रश्न, समस्या तालुका, जिल्हा स्तरावरच सोडवावेत. पण असे होत नसल्याने मंत्रालयात गर्दी होते. यासाठी लोकशाही दिन सारखे उपक्रम प्रभावीपणे राबविले जावेत, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील विविध ठिकाणी गुंतवणुकीसाठी उद्योजक येतात. त्यांना कसलाही आणि कोणाकडूनही त्रास होणार नाही, याची काळजी घ्या. हे केवळ उद्योग विभागाचे काम नाही तर क्षेत्रीय अधिकारी यांचेही काम आहे. (इज ऑफ वर्किंग) यासाठी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांचे अधिकारी आणि उद्योजक यांच्याशी संवाद साधावा, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले

जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रम आणि योजनांना भेटी दिल्या पाहिजेत. तसेच तालुका, गाव पातळीवर भेटी झाल्याच पाहिजेत. शाळा, अंगणवाडी आणि आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या पाहिजेत. यांचे वेळापत्रक निश्रि्चत करण्यात यावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. संबंधित जिल्हा पालक सचिवांनी आपल्या जिल्ह्यात सूचनांची अंमलबजावणी केली जात आहे का याबाबत लक्ष ठेवावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना

विभाग, कार्यालयाचे वेबसाईट अद्ययावत करा
ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेवर काम करा
शासकीय कार्यालयात स्वच्छता मोहिम राबवा
नागरिकांच्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे निकाली काढा
उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या
शासनाच्या महत्वाच्या प्रकल्प आणि योजनांच्या प्रकल्पांना भेटी द्याव्यात
शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्या

### सात कलमी कार्यक्रम बुलढाणा जिल्ह्यात प्रभावीपणे राबवला जाईल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनासाठी सात कलमी कृती कार्यक्रम निश्रि्चत करुन दिला आहे. त्यानुषंगाने जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेवून मुख्यमंत्र्यांनी सुचित केलेली कामे प्राधान्याने करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. हा सात कलमी कार्यक्रम बुलढाणा जिल्ह्यात प्रभावीपणे राबवला जाईल,अशी प्रतिक्रिया जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिली.

# दिल्ली विधानसभा : ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ८ फेब्रुवारीला मतमोजणी, आदर्श आचारसंहिता लागू

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार असून ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवार, दि. ७ जानेवारी रोजी पत्रकारपरिषदेत केली आहे. दिल्लीमध्ये मंगळवारपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा केली. यावेळी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ. सुखबीर सिंग संधू उपस्थित होते. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्तांनी निवडणूक प्रक्रियेवरील सर्व शंकांनाही उत्तरे दिली.

दिल्लीमध्ये एकूण ७० विधानसभा मतदारसंघ आहेत, त्यापैकी ५८ मतदारसंघ हे खुले तर १२ मतदारसंघ हे अनुसूचित जातींसाठी (एससी) राखीव आहेत. दिल्लीमध्ये एकाच टप्प्यात निवडणूक होणार असून त्यासाठी ५ फेब्रुवारी रोजी मतजदान होणार आहे, तर मतमोजणी ८ फेब्रुवारीला होणार आहे. अर्ज भरण्याची अंतिम तारीख १७ जानेवारी आहे. अर्जांची छाननी करण्याची तारीख १८ जानेवारी आहे. उमेदवारी माघारीची तारीख २० जानेवारी आहे.निवडणुकीच्या तारखांच्या घोषणेसह, राष्ट्रीय राजधानीत आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे आणि निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लागू राहील.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, दिल्लीत एकूण १.५५ कोटी नोंदणीकृत मतदार आहेत आणि त्यापैकी ८३.४९ लाख पुरुष आणि ७१.७४ लाख महिला आहेत. तरुण मतदारांची (२० ते २१ वर्षे) संख्या २८.८९ लाख आहे, तर प्रथमच मतदान करण्यास पात्र तरुणांची संख्या २.०८ लाख आहे. राजधानीत २६९७ ठिकाणी एकूण १३,०३३ मतदान केंद्रे असतील आणि त्यापैकी २१० मॉडेल मतदान केंद्र असतील. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या संदर्भात, विविध कायदा अंमलबजावणी संस्थांशी व्यापक चर्चा करण्यात आली आहे, ज्यामध्ये सुरक्षेशी संबंधित बाबींचाही समावेश आहे.




### पोटनिवडणुकीचीही घोषणा

केंद्रीय निवडणुक आयोगाने उत्तर प्रदेशातील मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा केली आहे, त्याचप्रमाणे तामिळनाडूतील इरोडे पूर्व विधानसभा मतदारसंघातही पोटनिवडणुकीची घोषणा केली आहे. दोन्ही ठिकाणी ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

# HMPV व्हायरसमुळे प्रशासन अलर्ट मोडवर

## कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द, रुग्णालयातील बेडची संख्या वाढवली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** चीनमध्ये क्वझत या नव्या व्हायरसनं शिरकाव केल्याने जगभरातील देशांची धाकधूक वाढवली आहे. सोमवारी बंगळुरू आणि गुजरातमध्ये या व्हायरसचे रुग्ण आढळल्याने खळबळ उडाली होती. या पाठोपाठ नागपूरमध्ये देखील एचएमपीव्हीची लागण झालेले दोन रुग्ण आढळून आले आहेत. कोरोना महामारीचा एकदा चटका बसल्यानं आता प्रशासन अलर्टमोडवर आलं आहे. महाराष्ट्रासह मराठवाड्यात शासकीय जिल्हा रुग्णालयांमध्ये बेडच्या संख्या राखीव ठेवण्यात येत आहेत. तर खबरदारी म्हणून औषधांचा साठा तयार ठेवण्यात येत आहे. कश्इ% रोगाच्या पार्श्वभूमीवर हिंगोली आरोग्य विभाग अलर्टमोडवर आला असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत.जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये २५ बेड आयसीयू तर ५० जनरल बेड आरक्षित करण्यात आले आहेत.तशी व्यवस्था जिल्हा सामान्य रुग्णालयात करण्यात आली असून या रोगाच्या बातमीवर तपासण्या करण्याच्या सूचनाही सर्व डॉक्टरांना दिले आहेत.

राज्यात खबरदारी म्हणून सोलापूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात विशेष पूर्वतयारी करण्यात आली आहे. रुग्णालयात काही बेड राखीव ठेवण्यात आले असून स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जात आहे.राज्य शासनाने वैद्यकीय मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली असून सर्व शासकीय रुग्णालयांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, शासकीय रुग्णालये आणि महाविद्यालयांत यंत्रणा तातडीने कामाला लागली आहे. रुग्णालयांमध्ये किमान तीन महिने पुरेल इतका औषधांचा साठा ठेवण्यात आला आहे. हा आजार घातक नसल्याचे स्पष्ट करत, सर्दी, पडसे किंवा खोकला दीर्घकाळ असल्यास तातडीने रुग्णालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी केले आहे.

जिल्हा रुग्णालयात बेडची संख्या वाढवली


हिंगोली जिल्ह्यात एचएमपीव्ही या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात २५ आयसीयू बेड आणि ५० जनरल बेड आरक्षित करण्यात आले आहेत.जिल्हा शल्य चिकित्सक नितीन तडस यांनी रुग्णालयातील तयार केलेल्या वॉर्डचा आढावा घेतला असून, या रोगाच्या तपासणीसाठी डॉक्टरांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. यासह जिल्ह्यातील सर्व रुग्णालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालयात या रोगावर आवश्यक व्यवस्था करण्यात आली असून, आरोग्य विभाग अलर्ट मोडवर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### काय करावं?

- खोकताना किंवा शिंकताना आपलं तोंड आणि नाकावर रुमाल किंवा टिश्यू पेपर ठेवावा.
- साबण, पाणी किंवा अल्कोहोलवर आधारित सॅनिटायझरनं आपले हात वारंवार धुवावेत.
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
- भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा.
- संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी व्हेंटीलेशन होईल, याची दक्षता घ्या.

### काय करणं टाळावं?

- खोकलेल्या किंवा शिंकलेल्या हातांनी हस्तांदोलन करणं टाळावं. यामुळे संसर्ग लगेच पसरतो.
- टिश्यू पेपरचा वापर केल्यानंतर तो कचरा पेटीत टाकावा. वारंवार एकाच टिश्यू पेपरचा वापर करणं टाळावं.
- आजारी लोकांपासून लांब राहावं. व्हायरल इन्फेक्शन झालेलं असल्यास शक्यतो रुग्णाच्या जवळ जाऊ नये. शक्य असल्यास त्याला घरातच आयसोलेट करावं.
- डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नये.



# सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग अनिवार्य, फडणवीस कॅबिनेटचे दोन मोठे निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी पार पडलेल्या बैठकीत वाहनांसाठी वापरले जाणारे फास्ट स्टॅग संदर्भात एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आता राज्यातील सर्व वाहनांना फास्ट टॅग अनिवार्य करण्यात आले आहेत. हा राज्यातील चारचाकी वाहनधारकांच्यादृष्टीने खूप मोठा निर्णय मानला जात आहे. १ एप्रिल २०२५ या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे या दिवसापासून राज्यात सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग अनिवार्य असेल. या निर्णयामुळे वाहनधारकांच्या नेमक्या काय प्रतिक्रिया उमटतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे:

मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

(मंगळवार, दि. ७ जानेवारी २०२५)

१) शासनाच्या प्रचलित सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण-२०१४ मध्ये सुधारणा करणार (सार्वजनिक बांधकाम विभाग)

१ एप्रिल २०२५ पासून राज्यात सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग अनिवार्य

२) महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा करणार (सामान्य प्रशासन विभाग)

- शासकीय कारभार अधिक पारदर्शक, गतिमान, लोकाभिमुख करण्यासाठी बदल

- मंत्रिमंडळापुढे आणावयाची प्रकरणे, मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी सादर करायची प्रकरणे, मा. राज्यपाल यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाची प्रकरणे, मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाची कार्यपद्धती इत्यादी बाबींसंदर्भात तरतुदी

३) ई-कॅबिनेट सादरीकरण होणार, यापुढे मंत्रिमंडळाच्या बैठका पेपरलेस होणार, आजच्या सादरीकरणानंतर ई-कॅबिनेट धोरणाची अंमलबजावणी होणार

महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा झाल्यामुळे नेमकं काय होणार?

मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, कॅबिनेटचे अधिकार, मंत्री परिषदचे अधिकार निश्चिती होणार. सोबतच विधानसभा कामकाज संदर्भात ही जबाबदारी निश्चित केली जाणार. विधान मंडळातील सादर करणाऱ्या विधेयकाची पद्धत ही निश्चित होणार. सोबतच प्रशासनातील अधिकाऱ्यांची अधिकार कर्तव्य निश्चित होणार.




### पालकमंत्रिपदाचा निर्णय नाहीच

प्रजासत्ताक दिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाबाबत निर्णय होईल, अशी चर्चा होती. मात्र, आजच्या बैठकीत पालकमंत्रीपदाबाबत काहीच निर्णय झालेला नाही. पालकमंत्री पदावरुन खातेवाटप्रमाणेच शिवसेना आणि भाजप यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरु असल्याची चर्चा आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना जिल्ह्याचे पालकमंत्रीपद शिवसेनेकडे होते. यंदा भाजपला संधी मिळाली पाहिजे, असा आग्रह स्थानिक भाजप कार्यकर्त्यांनी धरला असून याबाबत ठराव घेऊन पक्षश्रेष्ठींनादेखील साकडे घालण्यात आले आहे. त्यामुळे आता पालकमंत्रीपदाचा फैसला नेमका कधी होणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. सर्वात जास्त लक्ष बीडचे पालकमंत्रीपद कोणाला मिळणार, याकडे लागले आहे.

# मी राजीनामा दिलेला नाहीः धनंजय मुंडे

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा गदारोळ माजला आहे. वाल्मिक कराडला अटक करण्यात आली असली तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सर्वपक्षीय नेत्यांनी उचलून धरली आहे. सोमवारी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि धनंजय मुंडे यांच्या तब्बल एक तास चर्चा झाली. तेव्हा धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. मात्र, या सगळ्या चर्चांवर धनंजय मुंडेंनी स्पष्ट उत्तर दिलं आहे.

धनंजय मुंडे यांनी सोमवारी अजित पवारांची भेट घेतली. या बैठकीत त्यांनी राजीनामा दिल्याच्या चर्चा सुरू होत्या. आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक आहे. या बैठकीसाठी धनंजय मुंडे हे मंत्रालयात आले होती. त्यावेळी प्रसारमाध्यमांनी मुंडेंची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना तुम्ही राजीनामा दिला आहे का? असा प्रश्न विचारला असता त्यांनी बिलकुल नाही, मी राजीनामा दिलेला नाही, असं ठाम स्वरात म्हटलं आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला ईडीने नोटीस बजावली असल्याची सूत्रांची माहिती आहे. याबाबतही मुंडे यांना प्रश्न विचारला असता त्यांनी वाल्मीक कराडला ईडीने नोटीस दिली की नाही, याबद्दल मला काहीही कल्पना नाही, असं वक्तव्य त्यांनी केलं आहे.

सोमवारी धनंजय मुंडे यांनी अजित पवारांची भेट देऊन बीड प्रकरणातील आपली बाजू स्पष्ट केल्याचं खात्रीलायक सूत्रांनी सांगितलं आहे. विरोधकांनी केलेल्या आरोपावर मुंडेंनी अजित पवारांसमोर खुलासा केला. या सर्व घटनाक्रमाशी आपला काहीही संबंध नसल्याचे मुंडे यांनी अजित पवारांना सांगितलं आहे. बीड प्रकरणात जोपर्यंत पुरावा मिळत नाही तोपर्यंत धनंजय मुंडेंवर कारवाई केली जाणार नाही, अशी भूमिका पक्षाने घेतल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. न्यायालयीन चौकशी, एसआयटी व सीआयडी चौकशी होईपर्यंत कारवाई केली जाणार नाही असं सांगण्यात येत आहे.

CMYK

## पतंगराव नव्हे रॉकेटराव !

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८१ वी जयंती. ८१ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते. हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते. काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा. त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८० व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# चंद्रपूर जिल्ह्यात नवीन शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालय सुरू संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवावे

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या सूचना

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई /प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकाचा जिल्हा आहे. विविध उद्योगांची निर्मिती होत असून औद्योगिक दृष्टीने विकसित होत असल्याने याठिकाणी कुशल मनुष्यबळा ची आवश्यकता निर्माण होत आहे त्यामुळे चंद्रपूरजिल्ह्यातील मूल येथे नवीन शासकीय तंत्र



निकेतन महाविद्यालय सुरू संदर्भातील प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळ बैठकीत आणावा अशासूचना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी सांगितले. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, चंद्रपूर जिल्हा औद्योगिक विकासाच्या दृष्टिकोनातून अधिक समृद्ध व्हावा, उद्योगासाठी कुशल मनुष्यबळ आणि स्थानिक युवकांना तांत्रिक शिक्षण मिळून रोजगार निर्मिती व्हावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी माजी मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत मागणी केली आहे. यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव तयार करून मंत्रिमंडळा बैठकीत ठेवावे. मंत्रिमंडळ बैठकीच्या मान्यतेनंतर यासाठी अधिक गती देऊन महाविद्यालय सुरू करण्यात येईल. आज मंत्रालयात चंद्रपूर जिल्ह्यात नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीला माजी मंत्री तथा आमदर सुधीरभाऊ मुनगंटीवार, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव, उपसचिव अशोक मांडे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# दादरच्या पॉश एरियात ऑफिस, हिऱ्यांचा लखलखाट अन् घसघशीत रिटर्न्सचं आमिष दाखवून गंडवलं; 'टोरेस'चा मालक रातोरात दुबईला फरार?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई /प्रतिनिधी :** टोरेस कंपनीनं गुंतवणूकदारांना मोठा धक्का दिला आहे. गुंतवणूकदारांची फसवणूक करून टोरेस कंपनीचा मालक फरार झाला आहे. महिन्याला ४४ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून टोरेस कंपनीनं हजारो सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक केली आहे. या योजनेत १० हजारांपासून तब्बल एक कोटी रुपयांपर्यंत लोकांनी गुंतवणूक केली होती. त्या सर्व नागरिकांचे अब्जावधी रुपये घेऊन टोरेसचे व्यवस्थापकीय अधिकारी पसार झाले आहेत. नवी मुंबई, भाईंदर आणि दादरमधील सर्व शाखांना टाळं लावून या कंपनीचा मालक फरार झालय. आपली फसवणूक झाल्याचं लक्षात येताच टोरेस कंपनीच्या सानपाड्यातील शाखेवर अज्ञातांनी दगडफेक केली. दादर आणि भाईंदरमधल्या टोरेस कंपनीच्या शाखांबाहेर मोठी गर्दी झाली होती. टोरेस कंपनीच्या गैरव्यवहारप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २०२३ मध्ये नोंदणीकृत 'प्लॅटिनम हरेन प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीनं २०२४ मध्ये 'टोरेस' ब्रँड अंतर्गत दादरमध्ये ३० हजार स्क्वेअर फुटांचे आउटलेट उघडले. यानंतर कंपनीने मीरा-भाईंदरसह इतर ठिकाणी आऊटलेट्स उघडले.

'टोरेस'नं गुंतवणूकदारांना काय आश्वासन दिलं?

कंपनीनं सोने, चांदी आणि मॉयसॅनाइट्स (लॅबनं तयार केलेले हिरे) खरेदीवर त्याच रकमेवर अनुक्रमे ४८, ९६ आणि ५२० टक्क्यांचा वार्षिक परतावा देण्याचं वचन दिलं. त्यानंतर गुंतवणूकदारांना दर आठवड्याला परतावा दिला जात होता. दोन आठवडे परताना न मिळाल्यानं गुंतवणूकदारांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं.

हिऱ्यांऐवजी चेळीीरपळींश खरेदीवर जोर

कंपनी गुंतवणूकदारांना सोनं-चांदीऐवजी मॉयसॅनाइट खरेदी करण्याचा आग्रह धरत असे. त्यावर सर्वाधिक परतावा देखील देण्यात आला, जो साप्ताहिक ८ ते ११ टक्क्यांपर्यंत होता. कंपनीच्या वेबसाईटनुसार, प्लॅटिनम हरेन प्रायव्हेट लिमिटेडचे नोंदणीकृत कार्यालय गिरगावातील ऑपेरा हाऊस इमारतीत आहे. इम्रान जावेद, सर्वेश सुर्वे आणि ओलेना स्टाइन, असे कंपनीचे तीन संचालक आहेत. तिन्ही संचालकांनी त्यांचा निवासस्थानाचा पत्ता कंपनीचा पत्ता म्हणून दाखवला आहे.

## मुंबईतला सर्वात मोठा सीआरझेड घोटाळा; जमिनीचे १०२ सरकारी नकाशे बनावट

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईतला सर्वात मोठा घोटाळा समोर आलाय. सीआरझेड घोटाळ्यात जमिनीचे १०२ सरकारी नकाशे बनावट आढळले आहेत. शेतजमिनीवर बांधलेली अनधिकृत बांधकामं नियमित करण्यासाठी सातबारा आणि सिटीसर्वेत बेकायदेशीर फेरफार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी एसआयटीने चौघांना अटक केली असून १८ सरकारी कर्मचाऱ्यांना समन्स पाठवण्यात आले आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये दोन शिपाई आणि दोन दलालांचा समावेश आहे. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

पश्चिम उपनगरातील मालाड, मढ आयलंड येथील कोस्टल रेग्सुलेशन झोन (सीआरझेड)चे बोगस सरकारी नकाशे तयार करुन कोट्यवधींचा घोटाळा केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. भूमी अभिलेख कार्यालय, मुंबई महानगरपालिका व धनदांडगे यांच्या भ्रष्ट साखळीने संगनमत करुन हा घोटाळा केल्याचे उच्च न्यायालयाच्या आणि दर्शनात आले.

# अंथरुणाला खिळलेल्या आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन मंजूर

नवी दिल्ली : स्वयंघोषित आध्यात्मिक गुरू आसाराम बापू संदर्भात एक महत्वपूर्ण बातमी समोर आली आहे. बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय कारणास्तव ३१ मार्चपर्यत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने ८५ वर्षीय आसाराम बापूला सुटकेनंतर आपल्या अनुयायांना भेटू नये, असे निर्देश दिले आहेत. बापूंवर सध्या जोधपूरच्या आरोग्य मेडिकल सेंटरमध्ये उपचार



सुरू असून तो जोधपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत आहेत.

दरम्यान, आसाराम बापूवर यापूर्वी ही उपचारसाठी खोपोलीत दाखल केलं होतं. खोपोलीतील एका आयुर्वेदिक रुग्णालयामध्ये त्याच्यावर उपचार सुरू होते. या दरम्यान चोख सुरक्षा व्यवस्थेत आसाराम बापूला खोपोलीत दाखल करण्यात आले होते. अल्पवयीन मुलीवरील बलात्कारप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूला राजस्थान उच्च न्यायालयाने आता देखील दिलासा देत उपचार घेण्याची परवानगी दिली आहे. वैद्यकीय कारणासाठी आसारामला ३१ मार्चपर्यत अंतरिम जामीन मंजूर केला आहे

३१ मार्चपर्यंत अंतरिम जामीन मंजूर

मागील काही दिवसांपासून आसाराम बापूला ह्रदयविकाराचा त्रास होत होता. दरम्यान वैद्यकीय कारणासाठी आसारामला ३१ मार्चपर्यत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. जामिनाच्या कालावधीत देखरेखीसाठी सुरक्षा कर्मचारी तैनात करावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. आसाराम बापूला जोधपूर न्यायालयाने दोषी ठरवून आश्रमात एका किशोरवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. त्याच्या आश्रमात एका महिला शिष्यावर अनेक वेळा बलात्कार केल्याबद्दल त्याला गुजरात न्यायालयाने दोषी ठरवले होते.

बलात्कार प्रकरणी जन्मठेपेची शिक्षा

८५ वर्षीय आसाराम बापू हा २०१३ पासून जोधपूर तुरुंगात बंद आहे. आसारामला जोधपूर पोलिसांनी २०१३ मध्ये एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी इंदूर येथून अटक केली होती. आसारामने आपल्या आश्रमातच एका अल्पवयीन विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याचा आरोप होता. या प्रकरणी पाच वर्षांच्या प्रदीर्घ सुनावणीनंतर २५ एप्रिल २०१८ रोजी न्यायालयाने आसारामला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

याशिवाय दुसऱ्या एका प्रकरणातही आसारामला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आला आहे. गुजरातमधील गांधीनगर येथील आश्रमातील एका महिलेने आसारामवर बलात्काराचा गुन्हा दाखल केला होता. ३१ जानेवारी २०२३ रोजी न्यायालयाने आसारामला या प्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.


# पांड्या अन् गिलचा पत्ता कट? BCCI 'या' खेळाडूच्या खांद्यावर देणार उपकर्णधारपदाची जबाबदारी; रिपोर्टमध्ये मोठा खुलासा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई /प्रतिनिधी :** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पुढील महिन्यात म्हणजेच फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे, ज्याचे आयोजन पाकिस्तान करेल. पण टीम इंडिया पाकिस्तानचा दौरा करणार नाही, तर भारताचे सामने दुबईत होणार आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतीय संघाला इंग्लंडविरुद्ध पांढऱ्या चेंडूंची मालिका खेळायची आहे. दरम्यान, टीम इंडिया ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर होती आणि तिथे ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळली गेली. आता असाच एक रिपोर्ट समोर येत आहे, ज्यामध्ये बुमराहला मोठी जबाबदारी मिळू शकते असे बोलले जात आहे.

बुमराहला मिळणार मोठी जबाबदारी?

भारतीय क्रिकेटमध्ये अलीकडच्या काळात बरेच काही घडले आहे. गेल्या वर्षी श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात हार्दिकला उपकर्णधारपदावरून हटवून शुभमन गिलकडे जबाबदारी सोपवण्यात आली



होती. मात्र, आता मीडिया रिपोर्ट्समध्ये आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. वृत्तानुसार, हार्दिक किंवा गिल या दोघांनाही उपकर्णधारपद दिले जाणार नाही.

जसप्रीत बुमराहला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये टीम इंडियाचा उपकर्णधार बनवले जाऊ शकते. रोहित शर्माची कर्णधारपदी निवड निश्चित असल्याचंही रिपोर्टमध्ये सांगण्यात आलं आहे. जर बुमराह पूर्णपणे तंदुरुस्त असेल तर त्याच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी मिळणार हे निश्चित आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीसोबतच इंग्लंडविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठीही संघाची घोषणा केली जाणार आहे. दोन्ही संघात फारसा बदल होण्याची शक्यता कमी आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी खेळाडूंची कसोटी पाहण्यासाठी इंग्लंडची मालिका उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे तयारीची माहिती मिळू शकेल. भारत आणि इंग्लंड यांच्यातील एकदिवसीय मालिका ६ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. बुमराहला उपकर्णधार बनवण्यात आले असले तरी, तो इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील आणखी सामने गमावू शकतो. तो फक्त एक किंवा दोन वनडे खेळू शकतो.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यात झाली दुखापत

वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेत सर्वाधिक ३२ विकेट घेतल्या आहेत. पण पाचव्या कसोटीच्या पहिल्या डावात त्याला दुखापत झाली. दुसऱ्या डावात तो स्टेडियममधून रुग्णालयात गेला, तेथे त्याचे स्कॅनिंग करण्यात आले. खरंतर, बुमराला पाठीच्या दुखण्याने त्रास होत होता. त्यानंतर बुमराहला गोलंदाजी करता आली नाही, त्यामुळे संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

# अंजली दमानियांना मिळालं गोपनीय पत्र, वाल्मिक कराडबाबत नवा दावा, कागदपत्रांसह केला मोठा गौप्यस्फोट

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्येचा ठपका असलेला वाल्मिक कराड याचे अनेक कारनामे समोर येत आहे. त्याच्या बाबतीतील माहिती देखील समोर येत आहे. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी, नागरिकांमध्ये असलेली दहशत आणि प्रशासकीय यंत्रणेवरील त्याचा दबाव यानिमित्ताने समोर येत आहे. त्याचे अनेक घोटाळे, गुन्हे याबाबत आता चर्चा होताना दिसत आहे. अशातच सामजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा वाल्मिक कराडच्या वाइन दुकानाचा काळाबाजार बाहेर काढला आहे. अंजली दमानिया यांनी सोशल मिडिया पोस्ट करून त्यामध्ये त्यांनी माहिती आणि काही कागदपत्रे देखील शेअर केली आहेत.

नेमकं काय आहे प्रकरण?

अंजली दमानिया यांनी सोशल मिडियावरती कागदपत्र शेअर केली असून बीडमधील वाईनच्या दुकानांसंदर्भात त्यांनी आरोप केले आहेत. यासाठी त्यांना मिळालेल्या एका पत्राचा उल्लेख अंजली दमानिया यांनी आपल्या पोस्टमध्ये केला आहे.

अंजली दमानिया यांनी काय म्हटलंय पोस्टमध्ये?

अंजली दमानिया यांनी आज (मंगळवारी) सकाळी केलेल्या या पोस्टमध्ये त्यांना एक गोपनीय पत्र मिळाल्याचं म्हटलं आहे. 'एक गोपनीय पत्र काल संध्याकाळी आलं. या पत्राची माहिती मी मुख्यमंर्त्यांना दिली आहे. या पत्रात लिहिलं आहे की, समाजसुधारक वाल्मिक कराड यांची



केज, वडवनी, बीड आणि परळी इथे चार ते पाच वाईनची दुकानं आहेत. या प्रत्येक वाईन दुकानाचा बाजारभाव पाच कोटी इतका आहे. ही जमीन केज येथे १ कोटी ६९ लाखांना २९ नोव्हेंबर २०२४ रोजी घेतली. तीन दिवसांत याला परवानगी दिली गेली. वास्तविक जमिनीचा सातबारा १५ दिवसांनंतर होतो. पण सगळे कायदे कसे धाब्यावर बसवण्यात येतात याचं हे उदाहरण आहे', असं अंजली दमानिया यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### तिबेटमध्ये भूकंप, ५३ जणांचा मृत्यू

तिबेट : तिबेटमध्ये झिजांग प्रांतातील शिगाजे शहरातील डिंगरी काउंटीत स्थानिक वेळेनुसार सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी तर भारतीय वेळेनुसार सकाळी सहा वाजून पस्तीस मिनिटांनी ७.१ रिश्टर क्षमतेचा भूकंप झाला. या भूकंपाचे हादरे नेपाळ आणि भारतातही जाणवले. भूकंपामुळे तिबेटमध्ये आतापर्यंत ५३ जणांचा मृत्यू झाला असून ६२ जण जखमी झाले आहेत. मृतांच्या आणि जखमींच्या संख्येत वाढ होण्याची भीती व्यक्त होत आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली दहा किमी. आतमध्ये होता.

अमेरिकेच्या भूगर्भ सर्वेक्षण विभागाने आणि भारताच्या राष्ट्रीय भूकंप केंद्राने ७.१ रिश्टर क्षमतेच्या भूकंपाची नोंद केली आहे तर चीनच्या शिन्हुआ या वृत्तसंस्थेने ६.८ रिश्टर क्षमतेच्या भूकंपाची नोंद झाल्याचे वृत्त दिले आहे.

भूकंपामुळे जमीन हादरली. नेपाळमध्ये नागरिक घाबरून घरांबाहेर आले आणि बराच वेळ रस्त्यांवरच उभे होते. भारतात बिहार आणि उत्तर प्रदेशसह दिल्ली एनसीआरमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. याआधी डिसेंबर २०२३ मध्ये चीनच्या गांसु आणि किंघई प्रांतात ६.२ रिश्टर क्षमतेचा भूकंप झाला. या भूकंपामुळे १२६ जणांचा मृत्यू झाला होता.

### लग्नघरी कोसळला दुखाचा डोंगर, वराच्या आई-वडिलांनी उचललं टोकाचं पाऊल, मुलासोबत जेवण केलं अन् दोघांनी...; नाशिक हादरलं!

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** दोन दिवसांपूर्वी नाशिक जिल्हा रुग्णालयाच्या आवारातील झाडाला गळफास घेत एका महिलेने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. या पाठोपाठ आता नाशिकमध्ये आणखी एक आत्महत्येची घटना घडली आहे. मुलाच्या विवाहाची तयारी सुरू असताना आई-वडिलांनी आपली जीवनयात्रा संपवली आहे. आताम्हत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक शहरातील टिळकवाडी परिसरात शाह कुटुंब वास्तव्यास आहे. शाह कुटुंबातील धाकट्या मुलाचा लग्न सोहळा अवघ्या २० दिवसांवर आल्याने जोरदार तयारी सुरु होती. मात्र, त्यातच शाह दाम्पत्याने विष सेवन करून आपली जीवनयात्रा संपवली आहे.

मुलासोबत जेवण केलं अन् दोघांनी...

आपल्या मुलासोबत काल रात्री शाह दाम्पत्याने जेवण केले. यानंतर पती आणि पत्नीने विष सेवन केले. मुलाच्या लग्नाची तयारी घरात सुरू असताना आई-वडिलांनी आत्महत्या केल्याने शहा कुटुंबास मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. अवघ्या वीस दिवसांवर धाकट्या मुलाचा लग्न सोहळा असतानाच आई-वडिलांनी आत्महत्या केल्याने नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलीस पुढील तपास करत आहेत.

जिल्हा रुग्णालयाच्या आवारात महिलेची आत्महत्या

दरम्यान, रविवारी नाशिक जिल्हा रुग्णालयाच्या आवारात एक महिलेने गळफास घेत आत्महत्या केली. रुग्णालयाच्या आवारातील झाडाला गळफास घेत महिलेने स्वत:चे आयुष्य संपवलं. कविता अहीवळे असे महिलेचे नाव आहे. महिलेने गळफास घेतल्यानंतर रुग्णालयाच्या आवारात एकच खळबळ उडाली होती. यामुळे अनेक संशयास्पद घटनांच्या केंद्रस्थानी असणारे नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालय पुन्हा एकदा चाचेत आल्याचे दिसून आले.

### सलमानच्या सुरक्षेत वाढ! घराला बुलेटप्रूफ काच तर भिंतीवर काटेरी तार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणात मोठा खुलासा झाल्यानंतर लॉरेन्स बिश्नोई गँगकडून सलमान खानला जीवेमारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे सलमान खानच्या सुरक्षेबाबत सातत्याने पावले उचलली जात आहेत. अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यानंतर आता सलमान खानच्या गॅलेक्सी अपाट्रमेटच्या बाल्कनीमध्ये बुलेट प्रूफ काच लावण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सलमान खान आणि त्याच्या कुटुंबाच्या सुरक्षेला लक्षात घेता सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. सलमान खानच्या घराला बुलेट प्रूफ काच लावण्यात आली आहे. तसेच गॅलेक्सी अपार्टमेंटच्या सीमा भिंतीवर काटेरी तारही टाकण्यात येत आहे. ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरेही लावण्यात आले आहेत. एवढंच नाही तर अत्याधुनिक सुरक्षा उपकरणंही याठिकाणी तैनात करण्यात आली आहेत.

### मालेगावातील पैशांचा वापर 'व्होट जिहाद'साठीच, किरीट सोमय्यांचा आरोप; काँग्रेस खासदारांचा जोरदार पलटवार

**मालेगाव/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून मालेगाव व्होट जिहादचे प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहे. मालेगावातील नामको बँकेच्या शाखेतून बेरोजगार तरुणांच्या खात्याद्वारे १२५ कोटी रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी या प्रकरणावरून अनेक धक्कादायक आरोप केले. लोकसभा निवडणुकीवेळी मालेगावमध्ये व्होट जिहाद फंडिंग घोटाळा झाल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच मालेगाव हे रोहिंग्यांचे आश्रयस्थान झाले आहे. मालेगावात १५०० बांगलादेशी आणि रोहिंग्यांना जन्मदाखला देण्यात आल्याचा आरोप देखील किरीट सोमय्या यांनी केलाय. आता यावरून धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार शोभा बच्छाव यांनी किरीट सोमय्या यांच्यावर पलटवार केलाय. शोभा बच्छाव म्हणाल्या की, किरीट सोमय्या यांनी केलेला आरोप अत्यंत चुकीचा आहे. मालेगावमध्ये ११५ कोटी रुपये आले आणि लगेच काढले गेले, तेव्हा लोकसभा निवडणुका झालेल्या होत्या. हा पैसा कुठून आला याची सीबीआय चौकशी व्हावी. जनतेसमोर सत्य येईल, विनाकारण मालेगावची बदनामी करू नये. देशात असे पैसे कुठून-कुठून आले याचीही चौकशी व्हावी. मालेगावात रोहिंगे आणि बांगलादेशी नाहीत.

# आ. सिद्धार्थ खरात हा माझा गॅरंटीचा माणूस : माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे

## डॉ राजेंद्र शिंगणे यांनी जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे नेतृत्व करावे: प्रा.नरेंद्र खेडेकर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** येथून जवळच असलेल्या मौजे लोणीगवळी येथे आमदार सिद्धार्थ खरात यांचा जाहिर सत्कार कार्यक्रमाचे आयोजन येथिल ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे होते ते बोलताना आपल्या भाषणातून म्हणाले की आमदार सिद्धार्थ खरात हा माणूस माझ्या ग्यारंटीचा आहे त्यांनी माझ्याकडे जवळपास सात वर्ष काम केले, ते माझ्या मतदार संघाचे आहेत, त्यांना ३० वर्षाचा प्रशासकीय अधिकारी पदाचा अनुभव आहे, त्यांनी उत्कर्ष फाउंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले आहे,त्यांचा दुधाचा प्रकल्प सुरू आहे, अनेकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले आहे आणि मेहकर लोणार मतदार संघातील लोकांनी योग्य उमेदवार दिलाय, त्यांच्या उमेदवारी






अर्ज भरण्याच्या वेळेस मी आलो होतो, त्या जाहीर सभेत मी स्वतः सांगितले होते सिद्धार्थ खरात यांना निवडून द्या त्यांच्या पुढील कामाची ग्यारंटी मी घेतो आणि त्या वेळी मी ग्यारंटी दिली होती, आणि आपली ग्यारंटी काही मोदी ग्यारंटी नाही असा टोला सुद्धा त्यांनी त्या वेळी विरोधकांना मारला होता तसेच हे सरकार फेल आहे, त्यांच्यावर लोकांचा विश्र्वास राहिला नाही असेही माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी आपले मत मांडले, तर सत्काराला उत्तर देताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी जुनी आठवण काढत माझ्या गावाचा रस्ता सुधा डॉ राजेंद्र शिंगणे साहेब यांनी बनविला आहे, मी त्यांच्याकडे काम केले आहे तेच माझे राजकीय गुरू आहेत, आणि त्यांना या ठिकाणी शब्द देतो साहेब मेहकर लोणार मतदार संघातील विकासासाठी मी कधीही माघे पुढे पाहणार नाही,महाविकास आघाडीच्या वतीने हा माझा भव्य नागरी सत्कार सोहळा बघून माझे उर भरून आलं आहे.लोणी गवळीच्या जनतेने मला जे भरभरून प्रेम दिलं त्याचा मी शतशः ऋणी आहे,याप्रसंगी जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्रजी खेडेकर, प्रदेश सरचिटणीस काँग्रेस पार्टी श्यामभाऊ उमाळकर, जालिंदर भाऊ बुधवत जिल्हाप्रमुख शिवसेना, आशिष भाऊ राहाटे उपजिल्हाप्रमुख शिवसेना, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण दादा घुमरे, काँग्रेस नेते ॲड.अनंतराव वानखेडे यांनी सुध्दा आपल्या भाषणातून विविध विषयांवर चर्चा मंथन घडवून आणले आणि सर्वणुमते येणाऱ्या जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समितीच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे नेतृत्व डॉ राजेंद्र शिंगणे यांनी करावे असे साकडे घातले.

या वेळी विचार मंचावर शिवसेना शहर प्रमुख किशोर भाऊ गारोळे, तालुकाध्यक्ष निंबाभाऊ पांडव, दत्ताभाऊ घनवट तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,ॲड.आकाश घोडे तालुका अध्यक्ष युवा सेना, जि. प. सदस्य देवानंद भाऊ पवार, जि. प. सदस्य संजय भाऊ वडतकर, माजी सभापती पं स.सागर पाटील, प्रदीप बिल्होरे पाटील,सेवादलचे शैलेश बावस्कर, भागवत बोरकर, सेवादलच्या आरती दिक्षित यांच्यासह अनेक महाविकास आघाडीचे पदाधिकारी व लोणी गवळी गावचे बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर पाटील यांनी तर आभार शैलेश बावस्कर यांनी मानले.

## धनंजय मुंडे, पंकजा मुंडेंच्या मंत्रिपदाचा राजीनामा घ्या, लातूरमध्ये सकल मराठा समाजाची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरुन राज्यभरातील वातावरण प्रचंड तापले आहे. या पार्श्वभूमीवर मंगळावीर लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथे सकल मराठा समाजाकडून चक्काजाम आंदोलन करण्यात आले. त्यामुळे लातूर-परभणी रोडवरील वाहतूक खोळंबली आहे. त्यामुळे रेणापूर येथे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. याठिकाणी मराठा समाज चांगलाच आक्रमक झालेला पाहायला मिळाला. सध्या रेणापूरमध्ये चक्काजाम आंदोलनामुळे वाहतूक ठप्प झाली असून रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. या चक्काजाम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रेणापूरमध्ये तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

यावेळी मोर्चेकऱ्यांनी संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय द्या, अशी मागणी केली. जिल्हाभरात चक्काजाम आंदोलन पुकारण्यात आला आहे... लातूर शहरातील पाच नंबर चौक, अहिल्यादेवी होळकर चौक, छत्रपती संभाजी राजे चौक, रेनापुर शहरातील रेनापुर नाका, बोरगाव काळे, लातूर नांदेड रस्त्यावरील चाकूर येथे ही चक्काजाम आंदोलन पुकारण्यात आला आहे. उदगीर अहमदपूर तालुक्यातील अनेक भागात चक्का जाम आंदोलन सुरू आहे.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा कट करणारे तात्काळ फासावर लटकवा. मंत्री धनजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा घ्यावा. या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत त्यांचा राजीनामा घ्यावा. संतोष देशमुख यांच्या परिवारास आर्थिक मदत करावी . शासकीय नोकरीत सामावून घेतले जावे. यासाठी आज चक्का जाम आंदोलन करण्यात आले आहे. लातूर बार्शी रस्त्यावरील बोरगाव काळे येथे रस्ता रोको आणि चक्का जाम आंदोलन करण्यात आले आहे. याचा परिणाम वाहतुकीवर पाहायला मिळत आहे.

संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला केज तालुक्यात हत्या करण्यात आली होती. त्यांना निर्घृणपणे ठार मारण्यात आले होते. त्यांच्या अंगावर मारहाणीच्या अनेक खुणा होत्या. लोखंडी रॉडचे अनेक फटके मारल्यामुळे संतोष देशमुख यांच्या अंगातील जवळपास सर्व रक्त साकळले होते. हा सर्व प्रकार समोर आल्यानंतर मराठवाड्यासह राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. सध्या सीआयडी आणि एसआयटी संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा तपास करत आहे. आतापर्यंत धनंजय मुंडे यांचे निकवर्तीय वाल्मिक कराड यांच्यासह आणखी काही जणांना अटक करण्यात आली आहे. या सगळ्यांवर मकोका कायद्यातंर्गत कठोर कारवाई करण्याच्या हालचाली सुरु आहेत.

## मनसेत होणार मोठे फेरबदल!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) एकही जागा मिळवता आली नाही, ज्यामुळे पक्षाच्या कार्यपद्धतीवर आणि भविष्यातील वाटचालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षात मोठे बदल करण्याचा निर्णय घेतल्याचे संकेत दिले आहेत.



मनसेत मोठे फेरबदल

मनसे नेते संदीप देशपांडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना पक्षात लवकरच व्यापक फेरबदल होणार असल्याचे जाहीर केले. त्यांनी सांगितले की, राज ठाकरेंनी सर्व विभाग अध्यक्षांची बैठक बोलावून आगामी महानगरपालिका निवडणुकांसाठी तयारी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. या बैठकीत आगामी रणनीतीवर सविस्तर चर्चा झाली. पक्षात अनेक गोष्टींमध्ये बदल दिसून येतील, असे सूचक विधान देशपांडे यांनी केले.

विधानसभा निवडणुकीत मनसेने १२८ उमेदवार उभे केले होते, परंतु त्यातील एकाही उमेदवाराला यश मिळाले नाही. कल्याणचे आमदार राजू पाटील आणि राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरे यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले. यामुळे पक्षाच्या अंतर्गत गटबाजी आणि कार्यपद्धतीवर प्रश्न निर्माण झाले.

राज ठाकरेंनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना मागील निवडणुकीतील अपयश विसरून नव्या जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या सोशल पोस्टमध्ये पक्षातील नेते, पदाधिकारी, आणि कार्यकर्त्यांना नव्या दिशेने मार्गदर्शन करण्याचे संकेत दिले होते.

आगामी महानगरपालिका निवडणुकांसाठी मनसेची रणनीती काय असेल, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. पक्षाची जीर्णोद्धार प्रक्रिया आणि नवीन नेतृत्वाची घडण यामुळे मनसेला नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न होणार आहे.

आता, राज ठाकरेंच्या नेतृत्वाखाली मनसेचा पुढील प्रवास कसा असेल आणि पक्षाला पुन्हा स्थानिक पातळीवर यशस्वी बनवण्यासाठी काय पावले उचलली जातील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## 'पुष्पा २' नंतर आता रामचरणच्या 'गेम चेंजर'च्या इव्हेंटनंतर अपघात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** डिसेंबर २०२४ मध्ये अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' चित्रपटाच्या प्रीमियरवेळी मोठी दुर्घटना होऊन एका महिलेचा मृत्यू झाला होता. आता 'गेम चेंजर'च्या इव्हेंटनंतर अपघात होऊन दोन चाहत्यांचा मृत्यू झाला आहे. अभिनेता राम चरण याचा बहुप्रतिक्षित चित्रपट गेम चेंजरची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला असून त्याला चाहत्यांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. नुकताच गेम चेंजर चित्रपटाला प्री-रिलीज इव्हेंट पार पडला. या इव्हेंटवरुन परतताना दोन चाहत्यांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

'गेम चेंजर' चित्रपटाच्या इव्हेंटनंतर अपघात

आता राम चरणचा आगामी 'गेम चेंजर' चित्रपटच्या प्री-रिलीज इव्हेंटनंतर अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. शनिवारी रात्री राजमुंद्री येथे 'गेम चेंजर' चित्रपटाच्या प्री-रिलीझ कार्यक्रमाला त्याच्या दोन चाहत्यांनी हजेरी लावली. यानंतर अभिनेता राम चरणच्या दोन चाहत्यांचा मृत्यू झाला आहे. कार्यक्रमानंतर घरी परतताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. राम चरण आणि आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. 'गेम चेंजर' चित्रपटाच्या निमत्याने कार्यक्रमानंतर झालेल्या अपघातात जीव गमावलेल्या लोकांसाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे.

दोन चाहत्यांचा अपघातात मृत्यू

राम चरणच्या 'गेम चेंजर' चित्रपटाच्या प्री-रिलीज इव्हेंटला हजेरी लावल्यानंतर दोन चाहते बाईकवरून घरी परतत असताना रस्ते अपघातात दोघांचाही जीव गमवावा लागला. याप्रकरणी रंगमपेटा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अपघातातील मृतांची नावे अरवा मणिकंता (२३ वर्ष) आणि ठोकडा चरण (२२ वर्ष) अशी आहेत.

रस्ता अपघातात दोन जणांचा मृत्यू

चित्रपटाचे निर्माते दिल राजू यांनी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या दोन्ही चाहत्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत जाहीर केली आहे. दोन्ही तरुणांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपये आणि सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन निर्माते दिल राजू यांनी दिलं आहे. यावर प्रतिक्रिया देताना निर्माते दिल राजू यांनी मृतांना श्रद्धांजली वाहताना सांगितलं की, ''गेम चेंजर चित्रपटाच्या कार्यक्रमातून परतल्यानंतर दोन चाहत्यांचा मृत्यू झाला. तेव्हा पवन कल्याण यांनी मला विचारले की या कार्यक्रमांना काही पर्याय आहे का, कारण एवढ्या मोठ्या कार्यक्रमानंतर काहीही दुर्दैवी घटना घडते, तेव्हा किती दुःख होते, हे त्यांनी सांगितले''.

## धनंजय मुंडेंमध्ये इतकं काय की फडणवीस अन् अजितदादा कोणताच निर्णय घेत नाहीत? छत्रपती संभाजीराजे कडाडले

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. या प्रकरणाचा मास्टरमाइंड मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणावरून मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून सातत्याने केली जात आहे. त्यातच धनंजय मुंडे यांनी काल उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे धनंजय मुंडे राजीनामा देणार का? याबाबत चर्चांना उधाण आले होते. मात्र, आज धनंजय मुंडे यांनी मी राजीनामा दिलेला नाही, अशी प्रतिक्रिया माध्यमांना दिली आहे. यावरून छत्रपती संभाजीराजे यांनी जोरदार हल्लाबोल केलाय.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्यायासाठी मुख्यमंत्र्यांकडे जावं लागणं हे दुर्दैव आहे. जोपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा होत नाही आणि संतोष देशमुख यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरू राहणार आहे. धनंजय मुंडे यांच्यामध्ये इतकं काय आहे की मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री काहीच भूमिका घेत नाहीत. धनंजय मुंडे ओबीसी समाजाचे आहेत म्हणून सरकार ठोस भूमिका घेत नाही का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केलाय.

सरकार दुर्लक्ष का करतंय?

ते पुढे म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या हत्येला जातीय रंग देऊ नये. अजित पवार आणि धनंजय मुंडे यांची भेट केवळ नवीन वर्षाचे शुभेच्छा देण्यासाठी होती का? महाराष्ट्राच्या जनतेला मुर्खात काढत आहात का? संतोष देशमुख यांना मारत असल्याचे अनेक व्हिडिओ पोलिसांना मिळाले आहेत. पोलीस ते व्हिडिओ जनतेसमोर का आणत नाहीत? संतोष देशमुख यांच्या हत्येची तपासणी करण्यासाठी एसआयटी नेमली, त्यामध्ये वाल्मीक कराड सोबत संबंध असलेले अधिकारी आहेत. बीडमधील लहान मुलांपासून सर्वांना माहिती आहे की, या प्रकरणातील आरोपी कोण आहेत. मग सरकार याकडे दुर्लक्ष का करत आहे? महाराष्ट्रामध्ये दहशत पसरवण्याचे काम या घटनेमुळे होत आहे. या प्रकरणातील मारेकऱ्यांना शिक्षा देऊन दहशत मोडीत काढण्याचे पहिलं पाऊल उचलावं. या प्रकरणी अनेकांना धमकी आली आहे. मात्र, मला धमकी देण्याचे धाडस कोण करत नाही. जर कोणी धमकी देण्याचे धाडस केलं तर पुढे बघू, असेही त्यांनी म्हटले आहे.



# सहा दरोडेखोर २४ तासात जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

## ३ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** पिस्टल व चाकूचा धाक दाखवून वाटसरू ला अडवून दीड लाख रुपयांचा एवज लंपास करणाऱ्या दरोडेखोराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या २४ तासात जेरबंद केले आहे.ही धडाकेबाज कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे. घटनेबाबत प्राप्त माहितीनसार साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या रस्त्यावर आरोपीने फिर्यादी ह्यांचा मो.सा.ने पाठलाग करुन त्यांना रस्त्यामध्ये आडवुन चाकुचा व पीस्टलचा धाक दाखवून जीवाने मारन्याची धमकी देत त्यांचे कडील १लाख ४१ हजार ८६८ रुपये बळजबरीने घेवून पळून गेले. अशी तक्रार साखरखेर्डा पोलीस स्टेशन येथे ६ जानेवारी रोजी फिर्यादीने दिली होती. सदर तक्रारीची पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेत सदर प्रकरण स्थानिक गुन्हे शाखेकडे तपासासाठी वर्ग केले.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, अपर पोलीस अधीक्षक बी.बी.महामुनी, एसडीपीओ प्रदिप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक लांडे व एपीआय गजानन करेवाड



यांच्या आदेशान ६ जानेवारी रोजी साकरखेर्डा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्याचा तपास लावत या गुन्ह्यातील अंकीत दत्ताजे जगताप वय २३,धर्मा उर्फ अभिमन्यु रामभाऊ मंडळकर २३, विलास केशव खरात वय २८,गणेश दादाराव गवई वय २५, मंगेश रविंद्र गवई वय २५,अविश्कर उर्फ मारी तुषार गवई वय २२, या आरोपींना २४ तासामध्ये अटक करून १ लाख २६ हजार रुपयांची कॅश, एक लाख रुपये किमतीची दुचाकी, पाचशे रुपये किमतीचा चाकू, पाचशे रुपये किमतीची ड्यूब्लीकेट पीस्टल असा एकुण ३ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही धडाकेबाज कारवाई पीएसआय प्रताप बाजड, पोलीस कर्मचारी शरद गीरी, पुरुषोत्तम अघाव, दिपक वायाळ, मुडे,राजु आडवे,रुषी खंडेराव,धुड, गीते, परीहार,ईनामे, गवई, वाघ यांच्या पथकाने केली.

# 'आपला विदर्भ' च्या 'त्या' बातमीची दखल

## किनगाव जटू येथे घाणीचे साम्राज्य- तक्रार होती दाखल

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : किनगाव जटू- येथील ग्रामस्थं सचिन नागरे यांनी गावातील घाणीच्या साम्राज्यविषयी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २ जानेवारी मेल व्दारे तक्रार केली होती.

या तक्रारी बाबतचे वृत्त दि. ४ जानेवारी २५ रोजी आपला विदर्भ या दैनिकात पान नं २ वर वृत्त प्रकाशित झाले होते. सदर बातमीची ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने दखल घेऊन तसेच पत्रकार दिनाचे औचित्य साधुन ग्रामपंचायत प्रशासनाने सदर जागेवरिल कचरा



दैनिक आपला विदर्भ

मुख्य संपादक : देविदास सानपदे 9767233034

किनगाव जटू येथे घाणीचे साम्राज्य- तक्रार दाखल

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

बिबी : लोणार तालुक्यातील किनगाव जटु येथील जि.प. प्राथमिक मराठी मुलांच्या शाळेजवळ मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र आहे.

कचरा घंटागाडी केवळ नावालाच असुन वित्त आयोग निधी केवळ कागदोपत्रीच खर्च होत असल्याचा आरोप सचिन नागरे यांच्याकडून होतो आहे. घरात शौचालय असुनही काही नागरिक प्रांतकाळी ( भल्या पहाटे) रस्त्याच्या कडेला शौचास बसतात.यामुळे रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांच्या टायरला घाण चिटकून संपूर्ण गावामध्ये घाण पसरल्याचे चित्र आहे.यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गावात ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात असुन अनेक ठिकाणी घनकचरा उकिरडे साठलेले आहेत. गावात ठिकठिकाणी वाढते अतिक्रमण व मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरत असल्याकारणाने ग्रामपंचायत कर भरण्यासाठी अनेक नागरिक टाळाटाळ करित आहेत. बाबतीत कामे केवळ कागदावरतीच आहेत.

तरी वरिष्ठांनी याकडे लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थ सचिन नागरे यांच्याकडून होते आहे. तसेच याबाबतची तक्रार सुध्दा त्यांनी ईमेल व्दारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेली आहे.

Latitude: 19.970035
Longitude: 76.35506
Elevation: 495.49±3 m
Accuracy: 3.0 m
Azimuth: 169° (S)

04 Jan 2025 - Page 2 | www.aapalavidarbh.com
Powered by softisky | 9764331134

त्वरित हटवून साफसफाई केली. तसेच गावात ठिक ठिकाणी कचरा व्यवस्थापन करण्याचेही आश्र्वासन देण्यात आले आहे. गावात दिवसेंदिवस वाढत असलेले अतिक्रमण चिंताजनक बाब आहे. ही समस्यां ग्रामपंचायत प्रशासनाने सोडवावी अशी अपेक्षाही ग्रामस्थं सचिन नागरे यांच्याकडून व्यक्त होते आहे.

# ई-हक्क प्रणालीवर आता ऑनलाईन फेरफार नोंदी; नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** डिजीटल इंडिया भूमी अभिलेख आधुनिकरण कार्यक्रमांतर्गत शेतकरी व नागरिकांसाठी शेतजमिनीसंदर्भातील ११ प्रकारचे फेरफार नोंदी ऑनलाईन करण्याची सुविधा ई-हक्क प्रणालीव्दारे उपलब्ध करुन दिली आहे. या प्रणालीद्वारे नागरिक व शेतकऱ्यांना शेतजमीनीचे फेरफार नोंदी करणे सुलभ होणार असून ई-हक्क प्रणालीचा जास्तीत जास्त लाभ शेतकरी व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

सर्वसामान्य नागरिकांना वेगवेगळया सेवांसाठी शासकीय कार्यालयामध्ये जाऊन कागदपत्र सादर करावे लागतात. नागरिकांचा हा त्रास कमी व्हावा आणि त्यांना कालर्यादेत नोंदी उपलब्ध होण्यासाठी शासनाने ई-हक्क प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणाली व्दारे विविध प्रकारच्या ११ प्रकारचे फेरफार नोंदीसाठी ऑनलाईन सुवधि उपलब्ध करुन दिली आहे. नागरिकांना या सेवेचा लाभ घेण्यासाठी विशळसी.ारहरीरीहीर. सीं.ळप/षीडेसळप या संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी करावी लागते. संकेतस्थळावर गेल्यानंतर नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. तेथे जाऊन नोंदणी केल्यानंतर युजर आयडी व पासवर्ड टाकून विहीत माहिती भरावी. ई-हक्क प्रणालीवर ई-करार नोंदी, बोजा चढविणे/गहाण्खत, बोजा कमी करणे, वारस नोंद, मृतांचे नाव कमी करणे, अ.पा.क. शेरा कमी करणे,ए.कु.मे. नोद कमी करणे, विश्र्वस्तांचे नाव बदलने, खातेदाराचे माहिती भरणे, हस्तलिखित व संगणीकृत सातबारामध्ये तफावत दुरुस्ती करणे व मयत कुळाची वारस नोंद अशा ११ प्रकारच्या फेरफार सुविधा शेतकऱ्यांना करता येईल. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपले संबंधित तहसिलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांचे कार्यालयास संपर्क साधावा.

# बालविवाह एक सामाजिक समस्या: प्रा. दिलीप नाईकवाड




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : ५ जानेवारी आजच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर ग्रामवर्धन येथे बौद्धिक सत्रातील विषय - बालविवाह एक सामाजिक समस्या या विषयावर बोलण्यासाठी लाभलेले वक्ते सेवानिवृत्त प्रा.नायकवाड सर हे उपस्थित होते. यांनी जुन्या रूढी परंपरा तसेच बालविवाहाच्या कायद्यासंदर्भात सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांनी आपल्या भाषणात कायद्याचे सकारात्मक उपयोग कसे करावे हे सांगितले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर विजय नागरे सर (अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती ) हे होते .यांनी सुद्धा आपल्या अध्यक्षीय भाषणात बालविवाह म्हणजे काय व कायद्याच्या तरतुदी विद्यार्थ्यांना पटवून दिल्या सध्या विवाहाचं वय मुलींच्या अठरा व मुलांचे २१ असून यामध्ये बदल करण्यासंदर्भात शासनाचे धोरण ठरत असल्याचे त्यांनी सांगितले तसेच मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांमध्ये प्रा.डॉ.दिपक देशमाने प्रा. देवानंद नागरे सह कार्यक्रमाधिकारी नैना गवारे प्रा. महेश कायंदे प्रा .जगदीश यादव व प्रा.सत्यम श्रीवास्तव उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मेहर सर यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेविका कु. प्रतीक्षा नागरे हिने केले. तसेच या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्वयंसेविका कु. वैष्णवी राठोड हिने केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक गण तथा स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिबी येथे भाजपा युवा मोर्चाच्यावतीने सदस्य नोंदणी



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : दिनांक ७/१/२०२५ रोजी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा च्या वतीने लोणार व बिबी मंडळामध्ये सदस्य नोंदणीचा कॅम्प ऑर्गनाईज केले होते भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी या मोहिमेमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेऊन सदस्य नोंदणी केली भाजपा युवा मोर्चा चे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॅम्प राबवण्यात आला.

यावेळी प्रमुख उपस्थिती युवा मोर्चा जिल्हा महामंत्री शुभम देसाई हे होते तर या कॅमच्या आयोजन ता. अध्यक्ष राम डुकरे पाटील यांनी केले होते यावेळी शेकडो नागरिकांनी भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणी कॅम्पमध्ये सहभाग घेऊन सदस्य नोंदणी केली यावेळी शहर अध्यक्ष सागर मुर्तडकर, व्यापारी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष गोपाल काबरा, जिल्हा सरचिटणीस प्रविण धाईत, बाळासाहेब कुलकर्णी, भागवत मुळे, ऋषिकेश धाईत , दीपक लोहारे , आशिष अग्रवाल , संदीप आखाडे, शिवाजी आंधळे, भागवत आटोळे,सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते

# युवा ग्रामीण पत्रकार संघ ढाणकी कार्यकारणी गठीत

## अध्यक्षपदी शे. इरफान शे. गुलाब, उपाध्यक्षपदी करण भरणे तर सचिवपदी अशोक गायकवाड

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** बाळशास्त्री जांभेकर हे मराठी भाषेतील पहिले पत्रकार आहेत ज्यांनी 'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्रातून देशात मराठी पत्रकारितेचे युग सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केलेल्या 'दर्पण'मुळे मराठी पत्रकारितेचा इतिहास घडला. त्यांच्या स्मृतींना वंदन म्हणून हा दिवस 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या योगदानाचा आदर करण्यासाठी, दिनांक ६जानेवारी २०२५ रोजी गणेश कचकलवार राष्ट्रीय अध्यक्ष आदेशानुसार व संजय भोसले उप जिल्हा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनात




युवा ग्रामीण पत्रकार ढाणकी संघटनेची नवीन कार्यकारिणी गठित करण्यात आली. अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत २०२५ या वर्षाकरिता शे. इरफान शे. गुलाब यांची अध्यक्षपदी आणि करण भरणे उपाध्यक्ष तर अशोक गायकवाड यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणीत सहसचिवपदी प्रशांत अरेवाड, संघटक बंटी फुलकोंडवार, सल्लागार मिलिंद चिकाटे तर प्रसिद्धी प्रमुख पदी शे इरफान शेखजी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यकारिणीतील सदस्यांमध्ये शेख महेबूब शेख सुलेमान व अजिज खान आदींचा समावेश आहे.

कार्यकारिणी गठित झाल्यानंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करत वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.

## विविध वृत्त...

### जिल्हा रुग्णालयात आरोग्य तपासणी शिबीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमा अंतर्गत जिल्ह्यातील आरबिएसके संदर्भीत ह्यरोग असलेल्या ० ते १८ वयोगटातील बालकांची २ डि-इको तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथे सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ०८ वाजेपासुन सुरु होईल. या तपासणी शिबीराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी केले आहे.

### प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेत वीज देयक शून्य; जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना ही सरकारने ग्रामीण भागातील गरीब आणि वंचित कुटुंबांना वीज उपलब्ध करून देण्यासाठी राबवलेली योजना आहे. या पर्यावरणपूरक योजनेचा जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

ग्रामीण महाराष्ट्रासाठी वीज ही केवळ मूलभूत गरज नाही, तर एक विकासाची संधी आहे. सूर्यघर मोफत वीज योजना ही योजना ग्रामीण भागातील कुटुंबांना स्वच्छ, नवीकरणीय आणि दीर्घकालीन उपाय असल्यामुळे ही योजना पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. जिल्ह्यात योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी 'महावितरण'कडून विविध माध्यमातून योजनेचा प्रसार करण्यात येत आहे. योजनेत सहभागी होणा-या ग्राहकांना सर्व प्रकारचे तांत्रिक सहकार्य केले जात आहे. तरी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत भाग घेणाऱ्या नागरिकांना प्रति किलोवॅट ३० हजार याप्रमाणे प्रथम दोन किलो वॅटसाठी ६० हजार आणि तिसऱ्या किलोवॅटसाठी १८ हजार असे एकुण ७८ हजारांचे अनुदान केंद्र शासनामार्फत थेट ग्राहकांच्या खात्यात जमा करण्यात येते. या योजनेकरिता बँकेमार्फत नागरिकांना कर्जही देण्यात येते.

### अपत्य होत नसल्यामुळे लग्नाच्या वाढदिवशीच दाम्पत्याची आत्महत्या

**नागपूर/प्रतिनिधी :** जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मार्टीननगरात एका दाम्पत्याने लग्नाच्या वाढदिवशी आत्महत्या करण्यापूर्वी व्हिडिओ बनवला. तो व्हिडिओ व्हॉट्सॲप स्टेटसवर ठेवला आणि त्यानंतर गळफास घेऊन आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना मंगळवारी दुपारी बारा वाजता उघडकीस आली. मुलं होत नसल्यामुळे दाम्पत्याने जीवनयात्रा संपविल्याचे कारण समोर आले आहे. या घटनेमुळे जरीपटका परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

जारील ऊर्फ टोनी ऑस्कर मॉनक्रिप (५४) आणि पत्नी ॲनी जारील मॉनक्रिप (४५) अशी आत्महत्या केलेल्या दाम्पत्याची नावे आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टोनी आणि ॲनी यांनी प्रेमविवाह केला होता. दोघांचाही सुखी संसार सुरु होता. परंतु, त्यांना मुलं होत नव्हती. त्यामुळे आयुष्यात नैराश्य आले होते. दोघेही खचलेल्या मनाने एकमेकांना सांभाळून घेत संसार करीत होते. करोनानंतर टोनीच्या हातचे काम सुटले. तेव्हापासून टोनी नैराश्यात गेला. गेल्या दोन वर्षापासून टोनीच्या हाताला काम नव्हते. त्यामुळे दोघेही पती-पत्नी उदास राहत होते. मुलं नसल्यामुळे आता जीवनाला काय अर्थ आहे? असा प्रश्न त्यांना नेहमी पडत होता. मात्र, नातेवाईक त्यांची समजूत घालून दोघांचेही मन सांभाळत होते. परंतु, टोनी आणि ॲनी यांनी जीवनयात्रा संपविण्याचा निर्णय घेतला. गेल्या दोन महिन्यांपासून ते आत्महत्या करण्याच्या विचारात होते. दोघांनीही लग्नाच्या वाढदिवशीच आत्महत्या करण्याचे ठरविले. नातेवाईकांसह ख्रिसमस साजरा केल्यानंतर दोघेही निराश राहत होते. ६ जानेवारीला त्यांना आत्महत्या करायची होती. त्यामुळे सोमवारी दोघांनीही सकाळपासून जेवनसुद्धा केले नव्हते.

टोनी आणि ॲनी यांनी सोमवारी रात्री नातेवाईकांना फोन केला. विचारपूस केली आणि सर्व काही सुरळीत असल्याचे दाखवले. मध्यरात्रीनंतर पती-पत्नीने घरात दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी १० वाजले तरी टोनी आणि ॲनी झोपेतून उठली नसल्यामुळे शेजाऱ्यांनी चिंता पडली. त्यामुळे एका महिला शेजाऱ्याने त्यांना आवाज दिला. मात्र, दरवाजा आतून बंद होता. त्यामुळे त्या महिलेने खिडकीतून डोकावून बघितले असता पती-पत्नी गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. तिने लगेच अन्य शेजाऱ्यांना माहिती दिली. एकाने जरीपटका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेऊन दोघांचेही मृतदेह ताब्यात घेतले. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

### पैशांच्या पावसापोटी ३६ लाखांची फसवणूक, म्हसवडमध्ये दोन भोंदूबाबांविरुद्ध तक्रार

**सातारा/प्रतिनिधी :** हवेतून पैशांचा पाऊस पाडून त्याचे ३६ कोटी रुपये करून देतो, अशी बतावणी करून दोन भोंदूबाबांनी पाच जणांना ३६ लाख रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याबाबत म्हसवड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल होताच पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सखाराम बिरासदार यांनी दिली.

कांता वामन बनसोडे (रा. देवापूर, ता. माण) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. या दोघांनी दैवी शक्ती व जादूटोण्याद्वारे पैशांचा पाऊस पाडून २० पट रक्कम करून देतो, असे सांगत त्यांच्यासह पाच जणांना ३६ लाख रुपयांचा गंडा घातला. फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यावर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक सखाराम बिरासदार करत आहेत.